Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Educat
S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट
नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं./परीक्षा–८/२८२
पुणे – ४११००४
दिनांक –२३/०१/२०२४
२५

प्रति,

१ मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२ मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण.
३ मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई – ४०००३०.
४ मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नविन प्रसारण भवन, बॅक्बे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई–४०००३०.
५ मा. संचालक, आकाशवाणी केंद्र.
६ सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी.
७ मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्र.

**विषय :–**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत.

महोदय,

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु–मार्च २०२४ च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या दहा मिनिटे वाढीव वेळेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रांनी त्यांच्या वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.

**प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी :–**

१ विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ.
पुणे/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ
यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यता प्राप्त शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२ व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे. ३ अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
४ ऑनलाईन विभाग, राज्य मंडळ, पुणे. ५. लेखाधिकारी, राज्य मंडळ, पुणे. ६.ग्रंथालय , राज्य मंडळ, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :–**

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२ मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र शासन, शिक्षण आयुक्तालय कार्यालय, पुणे – ४११००१

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

## प्रकटन

**विषय :–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.

इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात आलेली होती.

**तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून सदरची दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर गतवर्षीप्रमाणे फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षांसाठी खालीलप्रमाणे वेळ वाढवून देण्यात येत आहे.**

फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षांचे वेळीही सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल.

सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| | परीक्षेची सध्याची वेळ | परीक्षेची सुधारित वेळ |
|---|---|---|
| सकाळ सत्र | स. ११.०० ते दु. २.०० | स. ११.०० ते दु. २.१० |
| | स. ११.०० ते दु. १.०० | स. ११.०० ते दु. १.१० |
| | स. ११.०० ते दु. १.३० | स. ११.०० ते दु. १.४० |
| दुपार सत्र | दु. ३.०० ते सायं. ६.०० | दु. ३.०० ते सायं. ६.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.०० | दु. ३.०० ते सायं. ५.१० |
| | दु. ३.०० ते सायं. ५.३० | दु. ३.०० ते सायं. ५.४० |

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

दिनांक – २३/०१/२०२४.